**फौजदारी किरकोळ अर्ज नं.९१/२०२२, निशाणी क्र.१२ खालील आदेश**

(CNR NO.:MHRT050005282022)

(सौ. अंकिता बाचीम व.२ वि. बाळाराम बाचीम)

प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज हा अर्जदारांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये वाढीव पोटगी म्हणून मागणी केलेल्या रकमेमध्ये वाढ करुन दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.२ हिने बारावीचे शिक्षण पूर्ण केले असून सध्या यश फाऊंडेशन नर्सिंग कॉलेज रत्नागिरी येथे नर्सिंग कोर्ससाठी प्रवेश घेतलेला आहे. सदर कोर्स हा तीन वर्षाचा असून त्यावर होणारा खर्च खूप आहे. त्या अनुषंगाने अर्जदारांनी परि.क्र.६ च्या शेवटी नवीन परिच्छेद समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. नवीन परिच्छेदातील मजकूरानुसार अर्जदार क्र.२ हिच्या नर्सिंग कोर्सची फी प्रत्येक वर्षी रु.१,३३,०००/- इतकी आहे. सदर फीमध्ये तिच्या राहण्याचा व खाण्याचा खर्च समाविष्ट आहे परंतु त्या व्यतिरिक्त सुद्धा तिला गणवेश, इतर साहित्य यावर खर्च आहे. अशा परिस्थितीत अर्जदार क्र.२ हिस मागणी केलेली वाढीव पोटगी रक्कम रु.५,०००/- च्या पुढे तिच्या नर्सिंग कोर्सची तीनही वर्षाची फी व लागणारे अन्य खर्च समाविष्ट करण्याची विनंती केली आहे.

०२. प्रस्तुत अर्जावर सामनेवाला यांच्याकरीता विधीज्ञ ए.एस.भिडे यांनी म्हणणे दिले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा खोटा व खोडसाळ असून अर्जामध्ये नमूद खर्चाच्या रकमा केवळ सामनेवाला याच्याकडून केवळ पैसे उकळण्याच्या हेतूने केल्या आहेत. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

०३. अर्जदारांकरीता विधीज्ञ श्री.बुटाला यांचा युक्तिवाद ऐकला. सामनेवाला व त्यांचे वकील गैरहजर. प्रस्तुत अर्जासोबत अर्जदार क्र.२ ही नर्सिंग कोर्स करत असल्याबाबत कोणताही पुरावा दाखल केला नाही. असे असले तरीही प्रस्तुतचा अर्ज हा केवळ दुरुस्ती करण्यासंदर्भात असून त्यावर अर्जदारांना पुढे पुरावा देण्याची संधी असणारच आहे. प्रस्तुत अर्जासोबत अर्जदार क्र.१ ने प्रतिज्ञापत्र नि.१३ दिले आहे. अर्जातील कथन व

अर्जदारांच्या वतीने केलेला युक्तिवाद ग्राहय धरुन प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यालायक आहे.

करीता खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

**०१.** अर्ज नि.१२ मंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जदारांनी मूळ अर्जामध्ये विनंतीनुसार दुरुस्ती करुन घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2024.08.07 10:44:41 +0530

**(संजय मो. चव्हाण)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,खेड,**

**दिनांकः ०६.०८.२०२४.** **ता. खेड, जि. रत्नागिरी.**

CERTIFICATE

I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou.S.K.Inamdar |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 06.08.2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 06.08.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 07.08.2024 |